# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक १२/०३/२०२५ (बुधवार) दुपार**

---

## नागपूर ग्रामीण जिल्हयात दिनांक १०/०३/२५ व दिनांक १४/०३/२५ रोजी पर्यंत राबविण्यात येत आहे ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह कारवाई बाबत विशेष मोहीम

आगामी होळी व धुलीवंदन सण असल्याने बरेच लोक मदयपान करून नशेत वाहन चालवित असतात. तसेच दैनंदिन वाहतूकीची स्थिती वरून वाढत्या ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह मुळे होणारी अपघातांची वाढती संख्या त्यावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून मा. श्री. हर्ष ए. पोद्दार पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली **दिनांक १०/०३/२०२५ ते १४/०३/२०२५ पर्यत** सातत्याने नागपुर ग्रामीण जिहयातील पोलीस स्टेशन, जिल्हा वाहतूक शाखा यांच्या वतीने मुख्य मार्ग, महामार्ग आणि मुख्य चौकांत मद्यपी वाहन चालकांना आवर घालण्यासाठी ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह मोहीम राबविण्यात येत आहे.

**सदर मोहीमेअंतर्गत दिनांक १०/०३/२०२५ रोजी एकूण २९ ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह केसेस आणि दिनांक ११/०३/२०२५ रोजी एकूण ४१ ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह केसेस अशा एकुण ७० केसेस करण्यात आल्या आहेत.**

उपरोक्त दारूचे सेवन करून वाहन चालक मिळून आल्याने त्यांच्यावर मोटार वाहन कायदा कलम १८५, १८४,१३०, २०७ अन्वये कारवाई करण्यात आलेली आहे. करिता संपुर्ण जिल्हयातील जनसामान्यांनी वाहन चालवितांना वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे ,मद्यप्राशन करून वाहन चालवू नये आणि अपघातास बळी पडू नये असे आव्हान नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलातर्फे करण्यात येत आहे.

## अवैधरित्या देशी,विदेशी, मोहाफुल दारू बाळगणा—या आरोपीतांवर नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई ३८ आरोपीविरूध्द गुन्हे नोंद एकुण ११,४२,१७५/— रू चा मुद्देमाल जप्त

आगामी येणाऱ्या सणोउत्सोव दरम्यान काही अनुचित प्रकार घडणार नाही या करीता नागपुर ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक मा. श्री. हर्ष पोद्दार यांनी नागपुर ग्रामीण यांनी गंभीर दखल घेवुन जिल्हयात **दिनांक ११/०३/२०२५** रोजी दारूबंदी कायदाअंतर्गत कारवाई बाबत मोहीम राबविली असुन सदर मोहीमेदरम्यान नागपुर ग्रामीण जिल्हयाचे विविध पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी, बुट्टीबोरी,वेलतुर,उमरेड, कुही, भिवापूर, काटोल, नरखेड, देवलापार, कन्हान, खापा, खापरखेडा, कळमेश्वर अश्या पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीसांनी मोहाफुल गावठी दारू गाळणाऱ्या वर छापा टाकुन **३१,५०० मिली. देशी दारू ,२७४२ मिली मोहाफुल दारू, ११,२५० लिटर मोहाफुल सडवा आणि साहित्य जप्त करून मौकयावर पंचानामा करून नष्ट करण्यात आले आहे. तसेच कन्हान पोलीसांनी विदेशी दारू सह ,दारू वाहतुकी साठी वापरलेली चारचाकी वाहन जप्त केले. सदर मोहीमेमध्ये देशी दारू,मोहाफुल दारू,मोहाफुल सडवा, विदेशी दारू, इतर साहीत्यासह १ चारी चाकी वाहन असा एकुण ११,४२,१७५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ३८ आरोपीतांवर ३८ गुन्हे दाखल केले आहे.**